# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## संगीत विभाग

## पर्यायवाचक प्रश्नसंच

**बी. ए. भाग-२ (सत्र-३)** **प्रा. डॉ. ज्वाला नागले**

१) मालकंस रागाचा थाट भैरवी आहे.

२) भैरवी रागाचा थाट भैरवी आहे.

३) बिहाग रागाचा थाट बिलावल आहे.

४) वृंदावनी सारंग रागाचा थाट काफी आहे.

५) आसावरी रागाचा थाट आसावरी आहे.

६) देस रागाचा थाट खमाज आहे.

७) मालकंस रागात रे प वर्ज्य आहेत.

८) मालकंस रागाची जाती ओडव ओडव आहे.

९) भैरवी रागाची जाती संपूर्ण संपूर्ण आहे.

१०) भैरवी रागामध्ये सर्वच बाराही स्वरांचा प्रयोग केला जातो.

११) बिहाग रागामध्ये रे ध हे स्वर दुर्बल आहेत.

१२) बिहाग रागाची जाती ओडव संपूर्ण आहे.

१३) आसावरी रागाची जाती ओडव संपूर्ण आहे.

१४) आसावरी रागाच्या आरोहात ग नि वर्ज्य आहेत.

१५) आसावरी रागामध्ये ग ध नि कोमल लागतात.

१६) मालकंस रागामध्ये ग ध नि कोमल आहेत.

१७) भैरवी रागामध्ये रे ग ध नि कोमल आहेत.

१८) देस रागाचे वांदी संवादी रे प आहेत.

१९) मालकंस रागाचे वादी संवादी म सा आहेत.

२०) आसावरी रागाचे वादी संवादी ध ग आहेत.

२१) देस रागाचा प्रयोग बहुत्वेकरून उपशस्त्रीय संगीतासाठी होतो.

२२) भैरवी राग मैफिलीच्या शेवटी गाण्याची प्रथा आहे.

२३) वृंदावनी सारंग रागाचा गानसमय मध्यान्ह आहे.

२४) वृंदावनी सारंग रागामध्ये दोन्ही निशादांचा प्रयोग होतो.

२५) देस रागामध्ये दोन्ही निशादांचा प्रयोग होतो.

२६) भैरवी राग दिवसाच्या/रात्रीच्या कोणत्याही प्रहरी गाण्याची मुभा आहे.

२७) मालकंस रागातील निशाद शुद्ध केल्यास चंद्रकंस हा राग होतो.

२८) वृंदावनी सारंग रागामध्ये ग ध स्वर वर्ज्य आहेत.

२९) वृंदावनी सारंग रागाची जाती ओडव ओडव आहे.

३०) बिहाग रागाचा गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर आहे.

३१) चौताल चा उपयोग धृपद गायनाकरीता होतो.

३२) चौतालासारखेच बोल असणारा पण दहा मात्रांचा ताल सुलताल आहे.

३३) तिव्रा तालामध्ये एकही काल नाही.

३४) रूपक तालाच्या पहिल्या मात्रेवर काल देतात.

३५) केरवा तालाचा उपयोग विशेषत्वाने सुगम व चित्रपट संगीतासाठी होतो.

३६) रूपक तालाचाउपयोग मध्यविलंबीत लयीचे ख्याल गायनासाठी होतो.

३७) दादरा तालामध्ये दादरा गीतप्रकार गातात.

३८) झपतालामध्ये मध्यविलंबीत लयीच्या ख्याल रचना गातात.

३९) मात्रा, खंड, टाळ्या व काल या दृष्टीने समानता असलेली तालजोडी एकताल-चौताल ही आहे.

४०) केवळ मात्रा आणि खंड या दृष्टीने समानता असलेली तालजोडी रूपक तीव्रा ही आहे.

४१) रूपक तालाच्या समेला अनाघाती सम असे म्हणतात.

४२) झपतालाच्या मात्रा १० आहेत.

४३) सुलतालामध्ये ५ खंड आहेत.

४४) एकताल, चौताल, त्रिताल, केरवा, दादरा, सुलताल, इ. तालांमध्ये सम मात्रांचे खंड आहेत.

४५) रूपक, तीव्रा, झपताल या तालांमध्ये विषम मात्रांचे खंड आहेत.

४६) केरवा तालाची दुप्पट तिसऱ्या मात्रेपासून येईल — दोन मात्रांमध्ये.

४७) दादरा तालाची दुप्पट चौथ्या मात्रेपासून येईल — तीन मात्रांमध्ये.

४८) रूपक तालाची दुप्पट ३.५ मात्रेपासून येईल — ३.५ मात्रांमध्ये.

४९) तीव्रा तालाची दुप्पट ३.५ मात्रेपासून येईल — ३.५ मात्रांमध्ये.

५०) झपताल व सुलतालची दुप्पट ६ व्या मात्रेपासून येईल — ५ मात्रांमध्ये.

५१) एकताल व चौतालची दुप्पट ७ व्या मात्रेपासून येईल — ६ मात्रांमध्ये.

५२) त्रितालाची दुप्पट ९ व्या मात्रेपासून येईल — ८ मात्रांमध्ये.

५३) त्रितालचा उपयोग शास्त्रीय गीतप्रकार गाण्यासाठी होतो.

५४) एकतालचा उपयोग शास्त्रीय गीतप्रकार गाण्यासाठी होतो.

५५) सुलतालचा मुख्य उपयोग धृपद गायनासाठी होतो.

५६) दुपारी बारा ते रात्री बारा हे दिवसाचे पुर्वांग होय.

५७) रात्री बारा ते दुपारी बारा हे दिवसाचे उत्तरांग होय.

५८) दुपारी बारा ते रात्री बारा या दिवसाच्या पुर्वांग वेळेत गायल्या जाणाऱ्या रागांना पुर्वांग राग म्हणतात.

५९) रात्री बारा ते दुपारी बारा या दिवसाच्या उत्तरांग वेळेत गायल्या जाणाऱ्या रागांना उत्तरांग राग म्हणतात.

६०) ज्या रागांचा वादी स्वर सप्तकाच्या पुर्वांगात असतो व जे राग दिवसाच्या पुर्वांगात गायले जातात त्यांना पुर्वांगवादी राग म्हणतात.

६१) ज्या रागांचा वादी स्वर सप्तकाच्या उत्तरांगात असतो व जे राग दिवसाच्या उत्तरांगात गायले जातात त्यांना उत्तरांगवादी राग म्हणतात.

६२) दिवस व रात्रीचा संधी किंवा मिलाप ज्या वेळी होतो, त्या वेळेला संधिप्रकाश वेळा म्हणतात.

६३) संधिप्रकाश वेळा दिवसाच्या २४ तासात दोन वेळा येते, सकाळी आणि संध्याकाळी.

६४) सकाळच्या संधिप्रकाश वेळी गायल्या जाणाऱ्या रागांना सकाळचे संधिप्रकाश राग म्हणतात.

६५) संध्याकाळच्या संधिप्रकाश वेळी गायल्या जाणाऱ्या रागांना संध्याकाळचे संधिप्रकाश राग म्हणतात.

६६) संधिप्रकाश रागामध्ये रे ध स्वर कोमल आणि ग शुद्ध असावे असा नियम आहे.

६७) भैरव पूर्वी मारवा या थाटातूनच संधिप्रकाश राग उत्पन्न होतात.

६८) सकाळच्या संधिप्रकाश रागात मध्यम शुद्ध असतो. संध्याकाळच्या संधिप्रकाश रागात तीव्र मध्यम असतो.

६९) शास्त्रीय संगीतात राग गायनाची दिशा निश्चित करणाऱ्या स्वराला अध्वदर्शक स्वर म्हणतात.

७०) एका थाटातील राग गायनाची वेळ संपून दुसऱ्या नजीकच्या थाटातील राग गायनाची वेळ जवळ येत आहे असे सुचित करणारा राग म्हणजे परमेलप्रवेशक राग होय.

७१) परमेलप्रवेशक रागाची गायन वेळ ही दोन प्रहरांच्या सीमेवरची किंवा बॉर्डरवरची असते.

७२) उ. अब्दुल करीम खाँ हे किराना घराण्याचे संस्थापक/प्रवर्तक होते.

७३) सदारंग-अदारंग हे महम्मदशाह रंगीले यांचे दरबारी गायक होते.

७४) सदारंग-अदारंग यांनी अनेक ख्यालांच्या रचना केल्या.

७५) सदारंग यांचे मुळ नाव न्यामतखाँ होते.

७६) व्हायोलीन हे एक तंतुवाद्य आहे.

७७) व्हायोलीन बो च्या सहाय्याने वाजवितात.

७८) व्हायोलीन हे स्वरवाद्य आहे. ते साथीचे व स्वतंत्र दोन्ही प्रकारांनी वाजविले जाते.

७९) व्हायोलीनला चार तारा असतात.

८०) अर्थ विरहीत शब्दांचा द्रुतलयीतील गीतप्रकार म्हणजे तराणा होय.

८१) तराण्याची लय द्रुत असते.

८२) लोकांनी लोकांकडून लोकांकरीता तयार केलेली गीते म्हणजे लोकगीते होय.

८३) लोकगीतांचा कर्ता अनामिक असतो.

८४) लोकगीत मौखिक परंपरेने प्रसारीत होतात किंवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रसारीत केले जातात.

८५) प्रत्येक प्रांतातील लोकगीते भिन्न भिन्न असतात.

८६) प्रत्येक प्रांताची भाषा, वेशभुषा, चालीरिती, संस्कृती यांचा प्रभाव लोकगीतांवर पडतो.

८७) ओवी, भारूड, गोंधळ, जोगवा, शेतकरी गीते, भोंडल्यांची गाणी, जात्यावरची गाणी, भुलाबाईची गाणी, गण-गवळण, इ. सर्व महाराष्ट्राची लोकगीत आहेत.

८८) पलुस्कर स्वरलिपी पद्धतीमध्ये तार सप्तकातील स्वरांच्या डोक्यावर उभी रेष देतात.

८९) पलुस्कर, स्वरलिपी पद्धतीमध्ये मंद्र स्वराच्या डोक्यावर टींब देतात.

९०) पलुस्कर, स्वरलिपी पद्धतीमध्ये मध्य सप्तकातील स्वरांना कोणतेही चिन्ह नाही.

९१) पलुस्कर स्वरलिपी पद्धतीमध्ये कोमल स्वरासाठी स्वराक्षर उजवीकडे हलन्त करतात.

९२) पलुस्कर स्वरलिपी पद्धतीमध्ये तीव्र स्वरासाठी स्वराक्षर डावीकडे हलन्त करतात.

९३) पलुस्कर स्वरलिपी पद्धतीमध्ये स्वर लांबवताना स्वरापुढे . . . देतात.

९४) पलुस्कर स्वरलिपी पद्धतीमध्ये शब्द लांबवताना शब्दापुढे sss देतात.

९५) पलुस्करताललिपी पद्धतीमध्ये पहिली मात्रा-सम १ ने दर्शवितात.

९६) पलुस्कर ताललिपी पद्धतीमध्ये काल $\pm$ या चिन्हाने दर्शवितात.

९७) पलुस्कर ताललिपी पद्धतीमध्ये एक मात्रेचे चिन्ह — आहे.

९८) पलुस्कर ताललिपी पद्धतीमध्ये ½ मात्रेचे चिन्ह ०० आहे.

९९) पलुस्कर ताललिपी पद्धतीमध्ये ¼ मात्रेचे चिन्ह $\cup$ आहे.

१००) पलुस्कर ताललिपी पद्धतीमध्ये खंडदर्शक रेषा $\perp$ एक आवर्तन पुर्ण झाल्यावर देतात.

~~~~~
~~~~~